बाकी आसामी साक्षीदार १०१ एकसे एक याचा साक्षीतील तारीख

आपले गावचे जोतीषपण पुरातन यजुरवेदीयाचे म्हणोन

३ कसबा वाई

१ जानोजी बिन लिंगो वाघ सेटे कालवट उमर वर्षे ५०

१ जाइजी बिा राजजी मेहतर साली उमर ५०

१ आर्जु वलद तानाजी परीट म्हेतरे उमर वर्षे ६०

---

३

२४ तरफ जोरखोरे

१ सुभानजी बिा सुगाजी पा सिंदे उमर वर्षे ५०

१ कालोजी बिा दताजी सिंदे पा उमर वर्ष ४० मौजे आसगाव

२ मोजे चावडी

१ नवलोजी बिन एसजी उमर ३०

१ रामाजी बिा सूर्याजी पा उमर वर्षे ५०

---

२

२ मौजे आयोसी

१ एसाजी बिा दताजी पा उमर ६०

१ मताजी दताजी पा उमर वर्षे ४०

---

२

काही जणानी कसब्याचे व काही जणानी मोघम मूळचा वतंदार लिंग जोसी ऋग्वेदी म्हणोन आ कसबा वाई

१ सटवोजी बिा आवजी गायकवाड नायकवाडी उमर वर्षे ७५

१ एसजी बिा जानोजी बोधे नायकवाड उमर ६०

१ एकोजी बिा बाजी नाईकवाडी उमर वर्षे ६०

१ नायकजी बिा धनाजी ढगे उमर वर्षे ९०

१ आनंदराव तुकाजी घाटगे नाइकवाडी उा ६०

१ माहादू बिा कासीबा तांबट म्हेतर उा ४०

१ कालोजी खलोजी बुधवंत नाइकवाडी उमर वर्षे २६

१ खंडोजी बिा सिवमाली मेहतर उा वर्षे ४०

१ नाइकजी बिा बकाजी सिंदे नाइकवाडी उा वर्षे ३०

१ भानजी बिा पिलाजी माली मेहतर ४०

१ रामजी बिा तुकोजी सिंपी मेहतर ६०

१ खंडो बिा मल्हारी सोनार मेहतर ४०

१ तुकोजी वलद लिंगोजी वीर उा ४०

१ दाऊद पा वलद जमाल पा

१ मौजे बालकवाडी भिवजी बिा कावजी जाधव उमर वर्षे ३०
१ मौजे परतवडी कुसाजी बिा बहिरो पा जाधव उमर वर्षे ३५
१ मौजे बोरगाव बुर्दुख संताजी बिा बाजी पा वाडकर उा ८०
१ मौजे गोलेगाव कृष्णाजी बिा रुद्राजी पा उमर वर्षे ३०
१ मौजे बोरगाव खुर्द दादजी बिा हाबजी वाडकर पा उा ७५
१ मौजे वहीगाव सिदोजी बिा कोडजी पा वाडकर उमर वर्षे ३५
१ मौजे नाहालेवाडी जानोजी बिा बहिरोजी पोल उमर वर्षे ४०
२ मौजे कोंढवली.
   १ धोंडजी बिा आनाजी पा पिसाल उमर ३०
   १ जानोजी बिा संताजी पिसाल पा उमर ३५

२

८ जोरखोरपैकी माहार
   १ मौजे आसगाव नाव-

१ कान ठाकूर वलद आमरसिंग ठाकूर उमर वर्षे २०
१ भिवजी वलद नरसोजी नाहावी मेहतर उमर वर्षे ३५
१ भागू वलद तुलजाजी चांभार मेहतर उमर वर्षे ४०
१ सिवा वलद तुकोजी चांभार मेहतर ५०
१ शामजी वलद सकाजी नायकवाडी
१ कालोजी सेटे उमर वर्षे ४०
१ तुलनाक वलद कृष्णनाक माहर ३५
२ रखमा वलद सिव राऊत व रामा वलद चाप राऊत मेहतर उमर वर्षे ४०

२३

पैकी जाजती सांगीतले आसामी
   १ सखोजी नाइकाजी सांगीतले की वासुदेव जोसी याचे वडीलास मुहूर्त पुसिला त्याने मुहूर्तावर मेणाची मेख करून खडकात टोकली मग मोगलाने वस्त्रे दिल्ही ह्मणोन
   १ रखमा राऊत याणे सांगीतले की सिके व केरसुणी लिंग जोसी यास देत गेला यजुर्वेदी यास दिल्ही नाही ह्मणोन

नाक वलद काना माहार उा ४०

१ मौजे चिखली रामनाक वलद खेलनाक माहर ४०

१ मौजे आमोसी संतनाक वलद काना माहर उमर ६०

१ मौजे वईगाव फोडनाक वलद जाननाक माहर उमर वर्षे ५०

१ मौजे मुगाव खंडनाक वलद संतनाक माहर ४०

१ मौजे नादगणे रामनाक वलद आनकनाक माहर उमर वर्षे ४०

१ मौजे बोरगाव खुर्द आलनाक वलद संतनाक माहर उमर वर्षे ३५

१ बलनाक वलद कृष्णनाक माहर मौजे कोढवली बुजुरूख उा ४०

---

८

---

२४

१४ तरफ जाबुलखोरे साक्षी एकंदर

१ जावजी नाहावी याणे सांगीतले की मूळ वतंदार लिंग जोसी खरा परंतु कोठे बोलू नको पैजारा खासील ऐसे आपले बापाने सांगी(त)ले ह्मणोन

१ सिवजी चांभार याणे सांगीतले की आपले बापापासोन यजुरवेदी खातात ह्मणोन

१ सटवाजी नाइकाने सांगीतले की रसूलखानापलीकडे ऋग्वेदीयाचा भोगवटा होता

---

५

कलम

१

मूळ वतंदार दिवाणजोसी बासुदेव जोसी खरे याआन्वये सांगी( त )ले आा कसबे वाई

१ सिवाजी बिा दताजी कासार मेहतर ४०

१ सेटी भाई गोई वलद मेहतर उमर वर्षे ६०

१ माहाद सेट बिा आपा तेली मेहतर ३५

१ तुलसाजी बिा एसाजी नाईक आहेर नाईकवाडी उमर वर्षे ६०

१ कुसाजी बिा त्रिंबकजी मेहतर गुरव उमर वर्षे ६०

---

५

२ मौजे वासोले

१ राघोजी बिा धोंडजी तुपे पाा उमर ३०

१ आवराजी बिा दादजी नवघणा पाा उमर ३०

---

२

१ मौजे कोढवले रंभाजी बिा कानोजी कांकडे पाा उमर४०

१ मौजे किरोंडे रामजी बिा कोंडजी पाा टवला उमर वर्षे ५०

१ मौजे वडवली तुकजी बिा कोंडजी पाा नलवडे उमर वर्षे ३५

१ मोजे खावली रतजी बिा आवजी सेकर पाा उमर वर्षे ७५

१ मौजे वासिवली भिवजी बिा संभाजी जाधव पाा उमर वर्षे ९५

१ मौजे जांवली नीलाजी बिा आनसोजी चिकणे उमर वर्षे ३०

१ मौजे भिवडी नवलोजी बिा सताजी सेकर पाा उमर वर्षे ४०

५ जाबुलखोरेपैकी माहर

१ मौजे जांवली राघा वलद

पैकी काही जणानी जाजती मार सांगितला आहे तो

१ सिवजीने सांगीतले की बेद-राकडून वासुदेवाचे वडील गोविंद जोषी आले त्याजला मुरार जगदेराव याणे दिवाण-जोतीष दिल्हे यापूर्वी आराधे याची वृती होती त्याचे बुडाले मग त्याजला प्राप्त जाली यजुरवेदी च्यार पुरुष आजमासे दोनसे वर्षे करीत आले ह्मणोन

१ माहादसेटीने सांगितले की गात्रमधे दुसरा कोणी चालवीत होता हे ऐकिले नाही आपले बापापासून यजुरवेदी चालवि-तात ह्मणोन

२ दिवाण निसबत चाकर माने ब्राह्मण व शूद्र मराठे याचे घरी मात्र याचे वडील चालवीत व पांढरीत यजुरवेदीयाचे वडी-ल चालवीत खल्यावर बलूते यजुरवेदी घेत याकरिता खले-जोषी ह्मणता ह्मणोन सांगी-तले आहे

--------------------------------- कलम

१

वतंदार जोसी कोण हे न कले ह्मणोन सांगीतले आ

१ भिवजी बिा दयाजी पाा व

धोंडा माहर उमर वर्षे ३०
१ मौजे खावली आकनाक वलद संतनाक माहर ३५
१ मौजे भिवडी धोंडनाक वलद लखनाक माहर ५०
१ मौजे काढवले कोंडनाक वलद तागनाक माहर ६०
१ मौजे वाघोले धोंडनाक वलद मालनाक माहर ६०

५

१४

१० समत हवेलीचे गावसाक्षी
१ मौजे कहोर कोंडजी बिा एसजी पाा भिकरे उमर वर्षे ६०
१ मौजे बेपर्डी नागोजी बिा रखमाजी घाटगा पाा उमर ४०
१ मौजे सिदनाथवाडी भिवजी बिा तुकोजी धनगर पाा ७५
१ मौजे मुरगाव राणोजी बिा सुभानजी यादव पाा उमर ६०
१ मौजे चिखली आनाजी बिा राजजी वाडकर पाा उमर ५०
१ मौजे मालतपूर बाजी बिा सुभानजी पाा उमर ६०

जावनजी बिा रुद्राजी पाा माढरे मौजे आभेपुरी ताा जोरखोरे
१ दीपनाक वलद नरसनाक माहर मौजे बोपर्डी उमर ४० समत हावेली
१ संतनाक वलद सावनाक माहर मौजे कुसगाव समत हावली उमर वर्षे ४०
२ प्रांत वाई
१ आबाजी बिा सुभाजी सुतार मेहतर उमर ६७
१ खंडोजी बिा सुलतानजी नाईक मुळीक उमर वर्षे ५०

२

६

पौ काही जणानी जाजती सांगीतले आहे ती कलमे
१ कडत जोसी यजुरवेदी यापासून आमचे गावी चालवितात ह्मणोन
१ लिंग जोसी ऋग्वेदी याचे वडील चालवीत होते रसूलखानाचे वेलेस कजिया जाला त्याआलीकडे यजुरवेदी आमचे घरी चालवीत आले ह्मणोन

२

१ कलम

१ मौजे कुसगाव महिमाजी बिा सिदाजी वेरे पाा ४०
१ मौजे व्याहाली सिदोजी बिा भिकाजी थोरवे पाा५०
१ मौजे आसरे व याइली व वारसे व रेकवले नव-लाजी बिा आनंदराव सणस मोकद्म पाा उमर ६०
१ मौजे व्याहली तुकनाक वलद कालनाक माहर उमर ५०

---

१०

१ मौजे धोम सोनजी बिा हिरोजी व सिवजी बिा लक्षमाजी पाा उमर ६० व सोनजी पाा मौजे बोरी व उमर वर्षे ५०
१ मौजे वेलंग सिदाजी बिा नागोजी पाा जेधे मोकदम व देशमुख ताा जोर उमर वर्षे ४५

---

५५

सदरहूपैकी काही जणानी भोगवटि-याचे पुरुषाची नावे च्यार व पाच व साहा डोयापर्यंत सांगीतली आहेत

१ कलम

आमचे गावचा जोसी वतंदार कुळ-कर्णी ह्मणोन सांगीतले

आमचे गावचे जोसपण च्यार डोया यजुरवेदी खात आले आपलीकडे आम्हास ठाऊक नाही ह्मणोन

१ताननाक रामनाक माहर मौजे लाहोर उमर वर्षे ३०
१ माहादा वलद काना माहर मौजे आभेपुरी उमर वर्षे ३०
१ महिमा वलद समनाक माहर मौजे बलकवाडी उाा ५०

---

२

कलम

१

नारू सिवदेव देशपांडे प्राा वाई याचे साक्षीत आमच्या पणज्यापासून आप-णापर्यंत कसबे मारचे गावजोतीष वतन ह्मणोन यजुरवेदी चालवीत आले व ऋग्वेदी वासुदेव जोसी याचे वडील दिवाण जोतीष चालवितात दिवाण जोतीष कृष्णराव खटावकर याचे कारकीर्दीस जाले ह्मणोन १

२ जिवजी पाा पिसाळ उमर वर्षे
४०
व जानोजी पाा भिताडा कसबे
बावधण
१ मौजे सेंदुरजणे संताजी बिाा
मालोजी पाा समत हावेली
उमर वर्षे ५०
१ मौजे खानापूर सदरहू संताजी
पाटलाचे आन्वये सांगीतले
सयाजी बिाा खंडोजी जाधव
समत हावेली उमर वर्षे ४०
२ मौजे सेंदुरणे एसाजी भगवंत
कुलकर्णी व एसनाक वलद
बहिरनाक माहार उमर ४०

---

६

पौ बावधणकर याचे साक्षीत ज्याज-
ती की आमचा जोसी कुलकर्णी
रोड्या होता त्याचे पोटी संतान नाही
मग त्याणे जोतीष बालजोसी यजुर-
वेदी खात आले व सेंदुरजणेकर
याने सांगीतले आमचे गावचे केरो-
जी व बहिरोजी व कोडजी जगथाप
याजपासोन गंगाधर जोसी यजुरवेदी
याचे वडील आजपावेतो खात गेले
ह्मणोन सांगीतले १ कलम

कालोजी गुजर हावालदार व कारकून
किले पांडवगड याणी लेहून पाठविले
त्यातील आन्वय गंगाधर जोसी यजुर-
रवेदी याचे तीर्थरूप व त्याचे लेक

किल्यास येतात आणि वतन खातात त्याहारखानापलीकडे कसे होते हे आपणास दखल नाही ह्मणोन

१ कलम

जाखोजी बिा चवडोजी नाइकवाडी कसबा वाई उमर ६५ त्याणे सांगीतले की आपला पणजा दादजी नाईक याचे वेलेस वासुदेव जोसी व गंगाधर जोसी याचे वडील पहिलेपासून कसबेयामध्ये चालवीत होते ह्मणोन १ कलम

---

एकूण तेरीज साक्षीदार

५५ किता
२३ किता
५ किता
६ किता
३ किता

---

१०१

पौ काही जणानी सांगीतला मार जाजती आहे त्याचा तपशील येणेप्रो

जांबुलखोरे व जोरखोरे व हावेली व पांडवगड व केलजा व कमलगड येथील यजुरवेदी चालवीत आले ह्मणोन १ कलम

शाहूमहाराजाचे वेलेस वाद पडला होता तेव्हा लिंग जोसी ऋग्वेदी खोटा जाला यजुरवेदी खरे जाले ह्मणून सांगीतले १ कलम

गोविंद जोसी याच्या वडलास देश- ऋग्वेदी याचा भोगवटा ऐकिला नाही ह्मणोन कलम १

वासुदेव जोसी यास पुरातन वाडा घर आहे यजुरवेदी याचे ठाऊक नाही ह्मणोन १ कलम

यजुरवेदी याणी जांबुलखोरे तेरा गावास रामाजी रघुनाथ मुतालीक ठेविला होता तो जोसपण आपलेच ह्मणो लागला तेव्हा रामाजीने

पांडे याणी जोसपणाचे महजर करून दिल्हे आहेत ह्मणोन १ कलम

वासुदेव जोसी ऋग्वेदी यांस पणद्रेकर ह्मणतात ह्मणोन १ कलम

यजुरवेदी यास पाटलानी गावगना इनाम दिल्हे आहेत ह्मणोन १कलम

धोमचे थडीचा आडकराचा व यजुरवेदीयास कजिया जाला ते समई आडकर खोटा यजुरवेदी खरे जाले त्याजला कागद करून दिल्हे त्याजवर आपल्या वडलाच्या निशाण्या आहेत उभयतास निमे करून दिल्हे ह्मणोन १ कलम

वासुदेव जोसी ऋग्वेदी यास इनाम आहेत ह्मणोन १ कलम

रवा काढला तो खोटा जाला यजुरवेदीयास खरेपणाचा महजर करून दिल्हा ह्मणोन कलम १

यजुरवेदीयाच्या कागदावर आमच्या वडलाच्या साक्षी आहेत ह्मणोन १कलम

यजुरवेदीयाचे घर भांडण होऊन वृती वाटे करून घेतले ह्मणोन १ कलम

गिटे याचा व यजुरवेदीयाचा कजिया जाला तेव्हा यिटे खोटे जाले ह्मणोन १ कलम

वासुदेव जोसी ऋग्वेदी याचे वडील कोटात मात्र दिवाणजोतीष चालवीत होते ह्मणोन दिवाण जोसी ह्मणत आले ह्मणोन १ कलम

न्याहार खानाचे वेलेस लिंग जोसी ऋग्वेदी याचा कजिया जाला तेव्हा लिंग जोसी याचे उरावर खानाने धोंडा ठेविला व कागदपत्र जाले न जाले हे ठाऊक नाही ह्मणोन १कलम